# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ब प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक १२
## सभावृत्तांत

दि. १८/१/२०१४ वेळ – सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार दिनांक १८/१/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता ब प्रभागाच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

1. मा. पवार यमुनाताई रमणनाना सभापती
2. मा. नेटके सुमन राजेंद्र
3. मा. तरस बाळासाहेब जयवंत
4. मा. भोंडवे संगिता राजेंद
5. मा. मोरेश्वर महादू भोंडवे
6. मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
7. मा. लोंढे गणेश नारायण
8. मा. शमीम पठाण
9. मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
10. मा. डोके अपर्णा निलेश
11. मा. को-हाळे अनंत सुभाष
12. मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख
13. मा. गावडे जयश्री वसंत
14. मा. पवार मनिषा काळूराम
15. मा. मासुळकर समीर मोरेश्वर
16. मा. पालांडे सुजाता सुनिल
17. मा. मंचरकर गिता सु शिल
18. मा. साबळे छाया जगन्नाथ
19. मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

सर्वश्री. मा. प्रभाग अधिकारी – सुभाष माछरे, मा. कार्यकारी अभियंता - रविंद्र दुधेकर - स्थापत्य, शरद जाधव - पा.पु., गोपाळराव चिंचवडे – विद्युत, वसंत काची - जलनि:सारण, प्रशासन अधिकारी – शांताराम राऊत, लेखाधिकारी – सुरेश आव्हाळे, उप अभियंता – डी. एन गट्टूवार - जलनि:सारण, सी. बी. कोंडे, व्ही.जी. कांबळे, एस.एम. कुदळे - स्थापत्य, व्ही. एन. देसले - पा.पु., एम.एस.चव्हाण- विद्युत, डी. के. बैचे –उद्यान, सहा. आरोग्याधिकारी- जे.एस जानकर., जी. एस. देशपांडे इत्यादी.

ठराव क्र.९४ विषय क्र. १
दिनांक- १८/०१/२०१४ विभाग – ब प्रभाग
सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक- मा. पालांडे सुजाता सुनिल

संदर्भ – मा. पवार यमुनाताई रमणनाना, मा. नेटके सुमन राजेंद्र, मा. तरस बाळासाहेब जयवंत, मा. भोंडवे संगिता राजेंद, मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर, मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव, मा. पवार मनिषा काळूराम, मा. साबळे छाया जगन्नाथ, मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास , मा. आसवानी सविता धनराज, मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव, मा. पानसरे अमिना मोहंम्मद, मा. मंचरकर गिता सुशिल, मा. मासुळकर समीर मोरेश्वर, मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन, मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख, मा. शमीम पठाण, मा. गावडे जयश्री वसंत, मा. ऍड. चिंचवडे संदिप गुलाबराव, मा. को-हाळे अनंत सुभाष, मा. डोके अपर्णा निलेश, मा. शेट्टी प्रसाद, मा. मोरेश्वर महादू भोंडवे, मा. पालांडे सुजाता सुनिल, मा. कदम कैलास महादेव, मा. ओव्हाळ शेखर अशोक यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम २९-अ (१) अन्वये १२ लाख लोकसंख्येपर्यंत ०४ प्रभाग समित्या आणि १२ लाख लोकसंख्येच्या पुढे अतिरिक्त ०३ लाख लोकसंख्येकरीता एक याप्रमाणे प्रभाग समित्यांची रचना करण्याची तरतुद आहे. त्याकरिता महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या विचारात घेऊन पुर्वीच्या अ,ब,क,ड, या ०४ प्रभाग समित्या व्यतिरिक्त नव्याने ०२ प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम २९-अ (१) मध्ये प्रत्येक शहरात महानगरपालिका ठरविल अशा लागुन असलेल्या निवडणुक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करणेत येईल असे नमुद आहे. त्यानुसार प्रभाग समित्यांची रचना करण्याचे अधिकार मा. महापालिका सभेला आहेत. त्यानुसार मा. महापालिका सभेने ठराव क्र. ३५१ दि. १९/०८/२०१३ अन्वये महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेल्या पुर्वीच्या ०४ प्रभाग समित्यांऐवजी खालील नमुद केल्याप्रमाणे एकुण ०६ प्रभाग समित्यांची त्यांचे कार्यक्षेत्रात समाविष्ठ होत असलेले प्रभाग व प्रस्तावित क्षेत्रिय कार्यालयांची ठिकाणे यासह पुनर्रचना करण्यात मान्यता दिली आहे.

पुनर्रचनेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | प्रस्तावित कार्यालय |
|---|---|---|---|
| 1 | अ क्षेत्रीय कार्यालय | ८,१०,१४,१५,१६,१७ ,१८,१९,२५,२६,२७ = ११ | भेळ चौक, प्राधिकरण, निगडी पुणे ४४ |
| 2 | ब क्षेत्रीय कार्यालय | २०,२१,२२,२३,२४,४२,४९,५०,५१,५२,५३ = ११ | एल्प्रो कंपनी आवार, लिंक रोड, चिंचवड पुणे ३३ |
| 3 | क क्षेत्रीय कार्यालय | ३७,३८,३९,४०,४१,५८,५९,६०,६१,६२,६३ ,६४ = १२ | हॉकी स्टेडीयम शेजारी, नेहरुनगर, भोसरी पुणे ३९ |
| 4 | ड क्षेत्रीय कार्यालय | ४३,४४,४५,४६,,४७, ४८,५४,५५,५६,५७ = १० | औध रावेत रस्ता, रहाटणी, पुणे १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | इ क्षेत्रीय कार्यालय | ६,७,२९,३०,३१,३२, ३३,३४,३५,३६ = १० | पांजळपोळ समोर, पुणे नाशिक रस्ता, भोसरी पुणे ३९ |
| 6 | फ क्षेत्रीय कार्यालय | १,२,३,४,५,९,११,१२ ,१३,२८ = १० | प्राधिकरणाचे जुने कार्यालय, टिळक चौक, निगडी पुणे ४४ |

त्यानुसार महापालिकेच्या अ,ब,क,ड,इ आणि फ मध्ये या प्रमाणे समित्यांची पुनर्रचना करुन नविन क्षेत्रीय कार्यालय अस्तित्वात येणेकामी मा. महापालिका सभेने ठराव क्र. ३५१, दिनांक १९/०८/२०१३ अन्वये मान्यता दिल्यानुसार पुर्वीचे ब प्रभाग समिती कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या उक्त ठरावात नमुद काही प्रभाग वगळुन इतर प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात समाविष्ठ केल्याने अथवा पुनर्रचनेनुसार इतर प्रभागातील प्रभागातील काही प्रभाग नव्याने समाविष्ठ करुन पुनर्रचित ब प्रभाग समिती अस्तित्वात आलेली असल्याने त्याकरीता क्षेत्रीय कार्यालय प्रत्यक्ष कार्यान्वित करणेकरीता आवश्यक त्या सांविधिक बाबींची / प्रक्रीयांची पूर्तता करुन प्रत्यक्ष कामकाज सुरु करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
पवार यमुनाताई रमणनाना
अध्यक्ष
ब प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
चिंचवड 411 033.

क्र. बप्र/२/कावि/१५/२०१४
दि. १८/०१/२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.